Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | जागतिकीरण: उच्च शिक्षण गुंतवणुक व गुणवत्ता<br>**डॉ. व्यंकटराव का. कदम** | ६७-६९ |
| १६ | आदिवासी जमातीचा शैक्षणिक विकास व शासकीय प्रयत्न: एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. प्रदीप दाजीबा पाटील** | ७०-७३ |
| १७ | शेतकऱ्यांची आत्महत्या : कारणे आणि उपाय<br>**डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे** | ७४-७७ |
| १८ | जातीवादाचे सामाजिक परिणाम आणि उपाय<br>**डॉ. होमराज राठोड** | ७८-८१ |
| १९ | विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव<br>**प्रा. जगदिश आर. वाटमोडे** | ८२-८५ |
| २० | शिक्षक व बिगर शिक्षकांच्या मुलांमधील शैक्षणिक आवड : एक तुलनात्मक अभ्यास<br>**दिनेश जारोंडे** | ८६-८९ |
| २१ | जागतिकीकरणाच्या काळात आदिवासींचा विकास : देशापुढील एक आव्हान<br>**सुनिल व्हि. कोडापे** | ९०-९६ |
| २२ | भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान<br>**श्री गिरीधर केशव कुनघाडकर** | ९७-१०० |
| २३ | मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची भुमिका<br>**डॉ. शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव** | १०१-१०५ |
| २४ | नक्षलवाद : कारणे व उपाययोजना<br>**प्रा. सोनकांबळे गंगाधर सोपान** | १०६-१०९ |
| २५ | यशस्वी जीवनाचे साधन म्हणजे आरोग्य<br>**डॉ. सुभाष वाघ** | ११०-११२ |
| २६ | महिला सक्षमीकरण व आरक्षण<br>**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे** | ११३-११५ |
| २७ | ग्रामीण विकास योजनांच्या संदर्भात ग्रामस्थांची जागरुकता : विशेष संदर्भ - चांदूर बाजार तालूका<br>**डॉ. प्रतिभा अशोक भोरजार** | ११६-११९ |
| २८ | राजकीय क्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण आणि भारतासमोरील आव्हाने<br>**प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे** | १२०-१२३ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १३. मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची भुमिका

**डॉ. शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव**
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

जगातील प्रत्येक देशाचा आणि त्या देशातील उद्योगांचा विकास हा त्या देशात उपलब्ध असलेल्या ससांधनाचा प्रभावी उपयोगावर अवलंबून असतो. हि संसाधन नैसर्गिक, वित्तीय आणि मानवी अशा तीन प्रकारची असतात. यामध्ये मानवी ससांधन हा घटक खुप महत्वाचा आहे. मानव संसाधन हा घटक नसेल तर इतर घटकांना काहीच अर्थ राहत नाही. त्यामुळे देशाच्या विकासाकरिता मानव संसाधन घटकाला अनन्य

उद्योगांचा विकास घडवून आणण्यासाठी, त्या उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्यक्तीगत व सामुहिक व्यवहारामध्ये अनुकूल बदल घडवून आणने आवश्यक असते. हे बदल घडवून आणण्यात व्यावसाहिक, तंत्र शिक्षण व प्रशिक्षणाची भुमिका महत्वाची आहे. आज झपाटयाने बदलत जाणाऱ्या व्यावसायीक तंत्रज्ञानामुळे तसेच जागतीकिकरण व खुल्या अर्थव्यवस्थेमुळे मानव संसाधन विकासात बदल करणे आवश्यक बनले आहे. स्पर्धेचे स्वरूप, नवनवीन शोध, आव्हाने या सर्वच बाबतीत उद्योग व्यावसायातील कर्मचारी वर्ग परिचित असणे आवश्यक बनलेले आहे. म्हणुन मानव संसाधन विकासात व्यवसायीक व तंत्र शिक्षण महत्वाचे ठरते आहे.

मानव संसाधन विकासामध्ये व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे. व्यावसायीक, तंत्र शिक्षणामुळे व्यक्तीच्या अंगी कार्य करण्याचे कौशल्य प्राप्त होते. विचार करण्याची क्षमता वृध्दींगत होवून नवीन ज्ञान प्राप्त होते तसेच नवनवीन कौशल्य आत्मसात करून उत्पादकता वाढवता येते. त्याचबरोबर व्यावसायीक व तंत्र शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राला, समाजाला अनुकूल अशी व्यक्तीमत्वे घडविता येतात. व्यवसायीक व तंत्र शिक्षण महाविद्यालये, आय.आय.टी., आय. आय. एम, यासारख्या संस्थामार्फत विविध आभ्यासक्रमांव्दारे देवून मानव संसाधन विकासाचे ध्येय साध्य केले जाते.

व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचे आभ्यासक्रम ठरवणे त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे यासाठी भारतात विविध व्यावसायिक व तंत्र शिक्षण संस्था कार्यरत आहेत. यामध्ये केंद्रीय तंत्रज्ञान शिक्षण संस्था– सी आय.ई.टी, केंद्रीय व्यावसायीक शिक्षण संस्था, राष्ट्रीय शिक्षण संस्था, एन. आय.ई या शिवाय आय.आय.टी., आय. आय. एम या संस्थाचा समावेश आहे. मानव संसाधन विकासात या व्यावसायीक व तंत्र शिक्षण संस्थांची भूमिका महत्वपुर्ण आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. व्यावसायीक व तंत्र शिक्षण संस्थांची मानव संसाधन विकासातील भुमिकेचा आढावा घेणे.
२. व्यावसायीक व तंत्र शिक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत व्यावसायीक व तंत्र शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी एकूण चार उपसंस्था कार्यरत आहेत. यामध्ये केंद्रीय शिक्षण तंत्रज्ञान संस्था, केंद्रीय व्यावसायीक संस्था, राष्ट्रीय शिक्षण संस्था आणि विविध विभागातील संस्था यांचा समोवश आहे.

**१. केंद्रीय शिक्षण तंत्रज्ञान संस्था**

हि संस्था १९८४ साली स्थापण करण्यात आली. इलेक्ट्रानीक माध्यमे, रेडिओ, दुरदर्शन, चित्रपट इत्यादींच्या सहाय्याने व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचा प्रसार शाळांमध्ये करण्याच्या संदर्भात हि संस्था कार्य करते. या संस्थेच्या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, ओरिसा आणि उत्तर प्रदेश या सहा राज्या शाखा कार्यरत आहेत.

**२. केंद्रीय व्यावसायीक शिक्षण संस्था**

एन.सी.ई.आर.टी च्या व्यावसायीक शिक्षण विभागाचे रुपांतर १९९७ मध्ये या संस्थेत करण्यात आले. भोपाळ येथे या संस्थेचे मुख्यालय आहे. हि संस्था व्यावसायीक व कार्यानुभव शिक्षणामध्ये संशोधन, विकास, प्रशिक्षण व विस्तार कार्यक्रम राबवले.

**३. राष्ट्रीय शिक्षण संस्था**

या संस्थेचे मुख्यालय एन.सी.ई.आर.टी च्या नवी दिल्लीत मुख्यालय आहे. हि संस्था राष्ट्रीय शिक्षण आणि प्रशिक्षण परिषदेसाठी व देशातील राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षण संसाधन गट म्हणुन कार्य करते. आखील भारतीय शिक्षणाचे सर्वेक्षण आणि नियोजन करण्याचे कार्य हि संस्था करते.

**४. विभागीय शिक्षण संस्था**

एन.सी.ई.आर.टी च्या पाच प्रादेशिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. यामध्ये उत्तर विभाग अजमेर, पश्चिम विभाग – भोपाळ, दशिण विभाग– म्हैसूर, उत्तर पुर्व विभाग– शिलॉग आणि पुर्व विभाग– भूवनेश्वर यांचा समावेश आहे. या संस्थामार्फत संशोधन, सर्वेक्षण, कार्यशाळा आयोजन यासारखे कार्य केले जाते.

- **मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची भुमिका**

व्यावसायीक व तंत्र शिक्षण देश आणि समाजाच्या विकासासाठी महत्वाचे आहे. आज जागतीकिकरणाच्या वाढत्या वेगामुळे औद्योगिकीकरण व सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे तंत्र कौशल्य असणाऱ्या मनुष्यबळाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. कौशल्यपुर्ण तांत्रिक ज्ञान असलेले व्यक्ती हेच विकासाचे खरे संसाधन ठरते आहेत. अशा मानवी संसाधनाची गुणवत्ता, दर्जा व्यावसायीक व तंत्र शिक्षणावर देशाचा आर्थिक, सामाजिक विकास अवलंबून आहे. प्रत्येक व्यक्तीला उत्पादन प्रक्रियेत सहभागी हावून त्याचे फायदे मिळवण्यासाठी व्यावसायीक व तंत्र शिक्षण उपयुक्त आहे.

व्यक्तीला सुखकर जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक असते तर समाजाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी सेवा पुरवणाऱ्या कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. व्यक्तीच्या अंगी हि कौशल्य विकसीत

करण्याचे कार्य व्यावसायीक व तांत्रिक शिक्षण करते. व्यावसायीक व तंत्र शिक्षण म्हणजे कामगारांचे, व्यवस्थापकांचे शिक्षण किंवा प्रशिक्षण होय. व्यावसायीक व तंत्र शिक्षण हे कौशल्य केंद्रीय असते. सर्व प्रकारच्या कौशल्यांचा समावेश व्यावसायीक व तंत्र शिक्षणात होतो. म्हणुन मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षण हा घटक महत्वाचा आहे. कारण मनुष्यबळाची गुणवत्ता हि व्यावसायीक व तंत्र शिक्षणावर अवलंबून असते.

नवनविन शोध आणि तंत्रज्ञानामुळे विशिष्ट कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता वाढत आहे. नवीन तंत्रे, यंत्रे, नवीन उत्पादन पध्दती समजावून घेवून त्याचा कार्यक्षम वापर करण्याचे कौशल्य व्यावसायीक व तंत्र शिक्षणातून प्राप्त होते. अशी कौशल्य प्राप्त करणारे शिक्षण उपलब्ध असेल तर कुशल मनुष्यबळ उपलब्ध होते. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढून आर्थिक व सामाजिक विकासाला चालणा मिळते. समाजाच्या प्रगतीबरोबरच नवीन वस्तू व सेवांचा वापर वाढत आहे. त्यामुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. हि मागणी पुर्ण करण्यासाठी आणि आवश्यक ते मनुष्यबळ निर्माण करण्यामध्ये व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची भुमिका महत्वाची आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्राची कुशल मानवी संसाधनाची गरज आज व्यवसायीक व तंत्र शिक्षणाव्दारे पुर्ण केली जात आहे. उद्योग आणि व्यावसायातील गरजेनुसार कौशल्य वृध्दींगत करावी लागतात. व्यावसायीतल जुने तंत्र व कौशल्य यांची मागणी कमी होते व नवीन कौशल्य, तंत्रज्ञानाची मागणी वाढते हे बदल कामगारांमध्ये निर्माण करण्यासाठी व्यावसायीक कौशल्य, तंत्रज्ञान व प्रशिक्षण महत्वाचे ठरते. नवीन कौशल्य आत्मसात केलेल्या कामगारांना अधिक वेतन मिळते कामगारांचा फायदा होतो. याशिवाय व्यावसायीक, तंत्रशिक्षण हे बेरोजगारी निर्मूलनाचे महत्वाचे साधन आहे. या शिक्षणामुळे व्यक्ती नोकरी किंवा स्वताःचा व्यावसाय करु शकते. त्यामुळे दारिद्र्यासाठी उपयुक्त होण्यास मदत होते.

मानवी संसाधन किंवा मनुष्यबळाची गुणवत्ता व्यावसायीक मुल्यांनी प्रभावीत होत असते. कर्तव्यदक्षपणा, कामातील शिस्त, नव्या बदलांचे स्वागत, नवीन कार्य व संधीचा वापर, उत्तम दर्जाच्या वस्तुंची निर्मीती, सातत्याने नवनवीन सुधारणा करणे, ग्राहकाभिमुख सेवा देणे हि सर्व व्यावसायीक मुल्य व्यावसायीक व तंत्र शिक्षणातून व्यक्तींचा अंगी निर्माण होतात. म्हणूनच मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचे महत्व असन्य साधरण आहे.

- **व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची सद्यस्थिती**

व्यावसायीक व तंत्र शिक्षणामुळे कुशल मनुष्यबळ आवश्यकतेनुसार उपलब्ध होते. उद्योग, व्यावसाय, व्यापार यांच्या विकासाकरिता व्यावसायीक व तंत्र शिक्षण महत्वाचे आहे. जागतीकिकरण, खाजगीकरण व उदारीकरणामुळे विदेशी बहुराष्ट्रीय उद्योग भारतात सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. त्यामुळे भारतातील सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणावर वाढ होउन व्यावसायीक व तंत्र शिक्षण घेतलेल्या कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. व्यावसायीक व तंत्र शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर विविध संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. उदा. 'पंडित दिनदयाल उपोध्याय

कौशल्य विकास संस्था'. तरी देखिल उद्योग आणि व्यावसायात आज कुशल मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे.

भारताची लोकसंख्या १.२ बीलीयन आहे. त्यातील ४६० मीलीयन लोक हे रोजगारक्षम आहेत. एवढया मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुण देणे एक आव्हान आहे. भारताची लोकसंख्या दरवर्षी १.६: टक्क्याने वाढत आहे. त्यामुळे देशातील अकुशलतेमुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. 'नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस' च्या २००९–१० च्या सर्वेनुसार सध्या भारतात ६.२: इतकी बेरोजगारी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ३५: भारतीय १५ वयोगटातील तरुण आहेत. १५ ते २४ वयोगटातील १८: टक्के तरुण भारतात आहेत. भारतातील तरुणांचे सरासरी वय २४ आहे. जगातील सर्वात तरुण देश म्हणुन भारताची ओळख आहे. भारतातील ५४: लोक शेती व्यवसाय करतात त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती पाहिजे त्या प्रमाणात उंचावलेली नाही शहरी भागातील लोकसंख्येपैकी ४२: लोक उद्योग व्यवसाय करणारे आहेत. तर १३: लोक हे नियीमत नोकरी करणारे आहेत. आज देखिल भारतातील ९०: मनुष्यबळ हे असंगठीत क्षेत्रात काम करते की, जेथे कोणत्याही प्रकारची सुरक्षितता मिळत नाही.

आज भारतात प्रत्येक वर्षी लाखो पदवीधर माहाविद्यालयातून पदवी घेवून बाहेर पडत आहेत. त्यांना पाहिजे त्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत नसल्याने त्यांची पात्रता असलेल्या कामापेक्षा कमी दर्जाचे काम कमी वेतनावर करावे लागत आहे. कारण आज रोजगाराच्या बाजारात केवळ पदवी शिक्षणाला महत्व नसुन कौशल्य शिक्षणाला महत्व आहे. रोजगाराच्या बाजारात दिवसेंदिवस कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे.

आज उपलब्ध असलेल्या रोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्य महाविद्यालयीन पदवी प्राप्त तरुणांकडे नाही. म्हणुनच आज व्यावसायीक व तंत्र शिक्षण महत्वाचे ठरत आहे.

व्यावसायीक शिक्षण हे मुलत: व्यवहारातील प्रत्यक्ष प्रक्रियेशी संबंधित असलेले शिक्षण आहे. व्यवसायीक व तंत्र शिक्षणाच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीला प्राप्त झालेले कौशल्य व अनुभवाचा प्रत्यक्ष वापर त्या व्यक्तीला आपले करिअर घडवण्यात होतो. या व्यावसायीक व तंत्र शिक्षणामुळे रोजगार संधी उपलब्ध होतात. हे शिक्षण विद्यार्थ्यांना काळाशी संबंधित प्रत्यक्ष अनुभव देते. आजच्या काळाची गरज म्हणुन मानव संसाधन विकासात व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचे महत्व अनन्य साधरण आहे.

- **सारांश**

आजच्या जागतीकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभुमिवर जगातील प्रत्येक देशाचा विकास त्या देशात उपलब्ध असलेल्या कुशल मानवी संसाधनावर अवलंबून आहे. हे कुशल मनुष्यबळ त्यांना दिल्याजाणाऱ्या व्यावसायीक व तंत्र शिक्षणातून निर्माण होत असते. व्यावसायीक व तंत्र शिक्षणामुळे व्यक्तीच्या अंगी कार्य करण्याचे कौशल्य प्राप्त होते. विचार करण्याची व योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. म्हणुन व्यावसायीक व तंत्र. शिक्षण देश आणि समाजाच्या विकासासाठी महत्वाचे आहे.

भारतात आज माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे तंत्र कौशल्यप्राप्त असणाऱ्या मनुष्यबळाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. कारण कौशल्यप्राप्त शिक्षण उपलब्ध असेल तर कुशल मनुष्यबळ उपलब्ध होते.

भारतातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाच्या सद्यस्थितीचा विचार केला तर तंत्र शिक्षण खुप कमी प्रमाणात उपलब्ध आहे. आज देखिल भारतात पारंपारिक शिक्षण देणाऱ्या संस्था व्यावसायीक व तंत्र शिक्षण संस्थांच्या प्रमाणात अधिक आहेत. भारतात तरुण मनुष्यबळ मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. परंतु कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. पदवी प्राप्त ६.२: तरुण आजही बेरोजगारीचे जीवन जगत आहेत. कारण त्यांच्याकडे उद्योग व्यावसायाचा आवश्यक असणारे कौशल्य नाही. म्हणुनच मानव संसाधन विकासात व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे.

- **संदर्भसुची**

१. पाबरा एन.टी : मानव संसाधन विकास संकल्पना व आव्हाने, धनपतराव आणि कंपनी प्रकाशन, दिल्ली.

२. काशिनाथ एच.एम : मानवी संसाधन विकास आणि शिक्षण, व्हॅल्युम २—२०११.

३. राजपुत जे.एस : शिक्षणातील जागतीक बदल, एन.सी.ई.आर.टी, नवी दिल्ली— २००४.

४. वार्षिक अहवाल: २०१३—१४ मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली.

५. वार्षिक अहवाल, लोकसंख्या आणि शिक्षण, २०१३—१४, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली.

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidisciplinary International E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. (I)

12 January 2018 Special Issue – 92

## Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This issue
Dr. Bidwe T.S.
Assit. Prof. Head of Dept.
Public Administraion
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends In Public Adinistration : Theories, Practice & Future

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Good Governance and Indian Democracy | Vijay Maroti Magare | 7 |
| 2. | Good Governance at a Glance | Dr. Santram Prabhakar Mundhe | 9 |
| 3. | सुशासन | प्रा.दीक्षित एस.डी. , प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस | 11 |
| 4. | नवलोकप्रशासन व व्यवस्थापन | प्रा. कल्याण ज्ञानोबा वडमारे | 13 |
| 5. | लोक प्रशासन काल, आज आणि उद्या | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 15 |
| 6. | लोकनिवड दृष्टिकोन | डॉ.मंचक मोर, डॉ.जे.बी. कांगणे | 17 |
| 7. | सुशासन संकल्पना | डॉ.एस.एन.आकुलवार | 19 |
| 8. | लोकनिवड दृष्टीकोन | डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर | 21 |
| 9. | सार्वजनिक धोरणाची प्रक्रिया | प्रा. बाबुराव भिमराव जाधव | 23 |
| 10. | लोक निवड द्रष्टिकोन - लोक प्रशासन | प्रा. डॉ.भोयटे अमित जनार्धन | 25 |
| 11. | व्यवस्थापन आणी प्रेरणा : खेळडूचे मनोबल वाढवणारे घटक | डॉ. डोंगरे माधव रा. | 27 |
| 12. | नवलोक व्यवस्थापन | हेळंबे हनमंत बालाजी | 29 |
| 13. | सुशासन तथा ई-प्रशासन | डॉ.भालेराव सुधाकर नारायण | 31 |
| 14. | नवलोक व्यवस्थापण संकल्पना आणि नवलोक व्यवस्थापनाचे पारिणाम | डॉ.प्रा.शिंदे डि.एस. | ३४ |
| 15. | सुशासन - विकासाची अनिवार्य अट | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 37 |
| 16. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी | डॉ.शिंदे सुरेखा सदाशिवराव | 39 |
| 17. | लोकप्रशासनातील एक नवप्रवाह - नवलोक व्यवस्थापन | प्रा.शेख मोहंमद हनिफ इस्माईलसाब | 41 |
| 18. | लोक प्रशासन आणि सुशासन | डॉ. आरडले एस.डी | 43 |
| 19. | आजच्या युगातील सु-शासन आणि स्मार्ट प्रशासन | प्रा. डॉ.जे.के. भालेराव | 45 |
| 20. | नवलोकप्रशासन- लोकप्रशासनाचे नवे क्षितिज | प्रा. गिता गिरवलकर | 47 |
| 21. | छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन (सुराज्य) | प्रा.डॉ. पांडुरंग पंढरीनाथ मुंढे | 52 |
| 22. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी लाभ, अडचणी व भवितव्य | डॉ. चंद्रशेखर गित्ते | ५५ |
| 23. | नागरिकांची सनद | **डॉ.दिपक एस वाघमारे** | **60** |
| **24.** | **Cyber Crimes Affecting Business Administration** | Dr. M.S. Bisen | 63 |
| **25.** | **E- Governance and E-Health in India: A Review** | **Ms.Seema Nikalje** | **66** |
| **26.** | **It Act For Good Governance** | **Dr. Khakare Vikas** | **69** |
| 27. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ.शिवाजी लच्छिराम राठोड | 72 |
| 28. | भारतातील ई-प्रशासन वाटचाल व सद्यस्थिती | **डॉ. गोविंद येडले** | **74** |
| 29. | लोकप्रशासनात ई-प्रशासनाची उपयोगिता : | डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव | 76 |
| 30. | भारतीय प्रशासकीय बदलात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका | डॉ. प्रमोद मा. आचेगावे | 78 |
| 31. | ई -शासन | प्रा. डॉ. दिंडे सुधिर प्रकाशराव, श्री. चव्हाण पंडित विठ्ठल | 80 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

# नवलोक व्यवस्थापण संकल्पना आणि नवलोक व्यवस्थापनाचे पारिणाम

**डॉ.प्रा.शिंदे डि.एस.**
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

आज २१ व्या शतकातील बदलत्या परिस्थितीनुसार लोकप्रशासनाच्या नवनवीन संकल्पनाचा उदय होत आहे. लोकप्रशासनामध्ये नविन संकल्पना विकसीत होत आहेत. इ.सन. १९७० च्या दशकानंतर लोकप्रशासनात नवलोक प्रशासन, लोकनिवड द्रष्टीकोन, ई-शासन, सुशान, प्रशासकिय संस्कृती, प्रशासकिय पर्यावरण, प्रशासकिय पारदर्शकता अशा अनेक संकल्पनाचा उदय व विकास झालेला आहे. त्यापैकीच नवलोक व्यवस्थापण हि एक संकल्पना इ.सन १९९० च्या दशकात उदयास आलेली आहे. नवलोक व्यवस्थापण संकल्पना हि लोकप्रशासन व व्यापार व्यवस्थापण अशा दोन्ही विषयाशी संबंधीत आहे. लोकप्रशानाच्या संदर्भात नवलोक व्यवस्थापनाचा मख्य उद्देश नोकरशासकीच्या भुमिकेत सकारात्मक परिवर्तन घडुन आणने हा आहे. सुरवातीच्या काळात समाजाच्या सर्व समस्या सोडवणारी यंत्रणा म्हणुन प्रशसकिय नोकरशाहिकडे पाहिले जात असे, कालांतराने मात्र नोकरशाहिमध्ये निरंकुश एकाधिकारशाही वृत्तीचा विकास झाला. नोकरशाही हि निरंकुश व अनियंत्रीत बनली नोकरशाहीच्या या निरंकुश अपर्याप्ततेतुन नवीन व्यवस्थपकिय दृष्टीकोनाचा उदय झाला तो म्हणजे नवलोक व्यवस्थापण होय.

नवलोक व्यवस्थापण दृष्टीकोन हा उत्तर नाकरशाहीचे प्रतीमान व बाजाराधिष्टीत लोकप्रशासन म्हणुन देखील ओळखले जाते. तर उद्योग क्षेत्रात नवलोक व्यवस्थापण उद्योगी सरकार म्हणुन आळखले जाते. लोकप्रशानाचे काही विचारवंत मात्र लोकप्रशासन व खाजगी प्रशासन यांच्यातील तिसरा मार्ग म्हणुन नवलोक व्यवस्थापणाला संबोधतात. नवलोक व्यवस्थानण हा वर्तमान व्यापक प्रशासकिय परिवर्तनासाठी वापरलेला शब्द आहे असे स्वीर्ड कॉमन म्हणतात.

**संशोधन लेखचा उद्देश**

१) नवलोक व्यवस्थपनाची संकल्पना आभ्यासणे.
२) नवलोक व्यवस्थापणाच्या परिणामाचा आढाव घेणे.
३) नवलोक व्यवस्थापनाची उपयुक्तता तपासणे.

उपरोक्त तीन उददेशाच्या दृष्टीने नवलोक व्यवस्थापण आणि नवलोक व्यवस्थापनाचे परिणाम या विषयावर प्रस्तुत संशोधन लेखात प्रकाश टाकण्यात आलेले आहे.

**नवलोक व्यवस्थापण संकल्पना**

नवलोक व्यवस्थापण संकल्पनेचा उदय इंग्लंडचे पंतप्रधान मार्गारेट थेचर व अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रिगन यांच्या विचारसरणी व कृतीतुन झालेला आहे. सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे यांसंबंधी रिगवाद व थेचरवाद आहे आणि यातुनच नवलोक व्यवस्थापन संकल्पना उदयाला आलेली आहे. डेव्हीड ओसबर्न गॅब्लर च्या मते, नवलोक व्यवस्थापण म्हणजे उत्प्रेरक सरकार होय उत्प्रेरक म्हणजे परिवर्तन घडवुन आणने होय. नवलोक व्यवस्थापनात पारंपारीक प्रशासन व्यवस्थेतील दोष दुर करुन धोरण व्यवस्थापनापेक्षा व्यवस्थापन कार्य निश्चीतीकरण व कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जातो. नवलोक व्यवस्थापन समाजाभिमुखता व कृतिप्रवनतेला प्राधान्य देते. नवलोक व्यवस्थापनाचे प्रमुख तीन ध्येय आहेत. त्यास 3ES असे म्हणतात.२

१) Efficiency - कुशलता
२) Economy - काटकसर
३) Effectiveness - परिणामकारकता

नवलोक व्यवस्थापनात व्यवस्थापण स्वायत्ता, आर्थिक प्रोत्साहन, मुल्यमापन, उत्पादन लक्ष, जबाबदारी, बाजाराधिष्टीत व्यवस्था यावर भर दिला जातो. नवलोक व्यवस्थापणात समाज व अर्थव्यवस्थेच्या विकासातील शासनाची पारंपारीक भुमिका बदलुन शासनाने बाजारकेंद्री भुमिका स्विकारावी यावर भर दिलेला आहे.

नवलोक व्यवस्थापण दृष्टीकोन शसनाने सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणे ऐवजी सार्वजनिक फायद्याचे वितरक आणि सामाजिक अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनास प्रोत्साहन द्यावे असे स्पष्ट करतो. उदारिकरन जागतीकिकरण व खाजगीकरण यांचा सामना करण्यासाठी शासनाने आपल्या यंत्रणेचे उत्कृष्ट संघटन, व्यवस्थपन व भ्रष्टाचार कमी करुन परिवर्तन घडवुन आणने म्हणजे नवलोक व्यवस्थापन होय.

नवलोक व्यवस्थापण म्हणजे शासनाने सेवा क्षेत्रातील आपल्या सर्व संधी खुल्या कराव्यात त्यामुळे सर्वसामान्य जनतेला उत्कृष्ठ सेवा देणाऱ्या पर्यायांची निवड करता येईल आणि उत्कृष्ट सेवांचा लाभ घेता येईल. शासनाने आपले

विस्तारीत क्षेत्र मर्यादित करावे नवलोक व्यवस्थपनाचा मुलभुत गाभा प्रथम सेवा, लवचीकता व शासनाची पुनर्रचना हा आहे.

**नवलोक व्यवस्थापनाची उपयोगीता**

नवलोक व्यवस्थापन संकल्पनेच्या विकासामुळे लोकप्रशासनाच्या कार्यात स्पष्टता, कार्यक्षमता, काटकसर या सारख्या तत्वांचा अंगिकार होऊन धोरणांपेक्षा व्यवस्थापनाला महत्त्व दिले जात आहे. सामान्यत: लोकप्रशासनाच्या कार्यात नवलोक व्यवस्थापनाची उपयोगीता खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

१. नवलोक व्यवस्थापनामध्ये धोरणापेक्षा व्यवस्थापन कार्याचे निश्चीतीकरण, मुल्यांकन आणि कार्याकुशतेवर भर दिला जातो. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यात गतीशीलता निर्माण झाली.
२. सार्वजनिक नोकरशहिचे विभाजन करुन कंत्राट व करार पध्दतीने कार्य केले जाऊ लागले. नवलोक व्यवस्थापनातुनच प्रशासनात काटकसर सुरु झाली.
३. नवलोक व्यवस्थापनामुळे व्यवस्थापकिय कार्यात स्वायत्तता निर्माण झाली.
४. अर्धबाजार पध्दती व कंत्राटीकरणामुळे स्पर्धेला प्रोत्साहन मिळाले. स्पर्धेमुळे प्रशासन कार्यात कार्यक्षमता निर्माण झाली.
५. नवलोक व्यवस्थापण संकल्पनेतुन प्रशासनाच्या सार्वजनिक क्षेत्रामध्ये व्यावसायीक व्यावस्थापनाचा स्विकार करण्यात आला.
६. लोकप्रशासनाच्या कार्यात नवलोक व्यवस्थापनातुन कार्यक्षमता निर्माण होऊन उच्च दर्जाच्या सेवा शिस्त आणि खर्चास प्रतीबंध झाला.
७. नवलोक व्यवस्थापनातुन प्रशासनाच्या विकासात्मक कार्यात होणारा संसाधनांचा अमर्यादित वापर कमी होऊन उच्च दर्जाची शिस्त निर्माण होत आहे.
८. नवलोक व्यवस्थापन जनसहभागाला प्रोस्ताहन देते त्यामुळे सेवांचा दर्जा व व्यवहारामध्ये पारदर्शकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

**नवलोक व्यवस्थापनाचे परिणाम**

इ.सन १९९२ मध्ये नवलोक व्यवस्थापन संकल्पनेचा उदय झाला. नवलोक व्यवस्थापन संकल्पनेत उत्प्रेरक शासन, समाजाभीमुख शासन, स्पर्धात्मक शासन,कृतीशील शासन, अंदाज बाजाराभीमुख शासन, आणि कार्याच्या विकेंद्रिकरणाला महत्व दिलेले आहे. या तत्वांच्या स्विकाराचा परिणाम म्हणज शासनाने आपल्या कार्यपध्दतीमध्ये बदल केला. नवलोक बदल आणि त्याचे परिणाम खालील प्रमाणे स्पष्ट होतात.

१. नवलोक व्यवस्थापाच्या स्विकारातुन शासनाने स्वतंत्र सार्वजनिक संघटनांची निर्मीती केली. त्यामुळे निर्णयाचे व्यवस्थापणास स्वातंत्र्य मिळाले.
२. नवलोक व्यवस्थापन संकल्पनेत मित्तव्ययता व काटकसर या तत्वांना प्राधान्य असल्याने सामाजीक कल्याण कार्यक्रमांवर होणाऱ्या खर्चात कपात करण्यात येत असून अंदाजपत्रकात कपात केली जात आहे.
३. सार्वजनिक सेवांमध्ये शिस्त निर्माण केली जात असून नवलोक व्यवस्थापनामुळे लोकसेवेच्या संरचनेत सुधारणा करण्यात येत आहेत.
४. शासनाच्या मालकिचे असलेले सार्वजतिक उपक्रमांचे खाजगीकरण करून निर्गुंतवणुक धोरणास प्राधान्य दिले जात आहे.
५. शासनाच्या कार्याचे व्यापक क्षेत्र कमी होऊन उत्कृष्ट नवलोक व्यवस्थापनाच्या स्विकारातुन शासनाच्या कार्यात घट होत आहे.
६. नवलोक व्यवस्थापनामुळे शासन कार्याचे मुल्यमापन प्रभावीपणे केले जाऊ लागले. त्यामुळे शासन कार्यात पारदर्शकता निर्माण होत आहे.
७. नौकरशहीच्या एकाधिकार सत्तेला नवलोक व्यवस्थापनात आळा बसून अधिकार सत्तेचे विकेंद्रीकरण झाले.
८. उत्कृष्ट सेवा पुरवणाऱ्या खाजगी संघटना, स्वयंसेवी संस्था अभिकरणे यांना सेवेचे कंत्राट देउन कार्य केले जात आहे.
९. प्रशासन कार्यात पाळली जाणारी गुप्तता नष्ट करण्यात येउन माहिती सर्वांसाठी खुली करण्यात आली.
१०. शासनाच्या कार्यात जनसहभागाला महत्व प्राप्त झाले ते नलोक व्यवस्थापनामुळेच त्यातुन शासन कार्यात पारदर्शकता येण्यास मदत झाली.
११. नवलोक व्यवस्थापन संकल्पनेतून शासनाची सुशासनाकडे वाटचाल होउन सुशासन निर्मीती होण्यास मदत होत आहे.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

**निष्कर्ष व सारांश**

नवलोक व्यवस्थापनाची संकल्पना व नवलोक व्यवस्थापनाचे परिणाम अभ्यासले असता या अभ्यासातून सामान्यत: खालील निष्कर्ष निघतात.

नवलोक व्यवस्थापन हि संकल्पना नोकरशाहीच्या एकाधिकार निरंकुशतेतुन उदयास आलेली आहे. नवलोक व्यवस्थापन संकल्पनेत कुशलता, काटकसर परिणामकारकता यांना महत्व दिले जाते. त्यामुळे जबाबदार व बाजाराधिकम शासनाची निर्मीती होण्यास मदत झाली. नवलोक व्यवस्थानामुळे व्यवस्थापन कार्यात स्वायत्तता निर्माण होउन प्रशासन कार्यात कार्यक्षमता निर्माण झाली. नवलोक व्यवस्थापनामुळे प्रशासनाच्या कार्यातील मक्तेदारीला आळा बसून प्रशासन कार्यात स्पर्धात्मकता निर्माण झाल्याने प्रशासनात कार्यक्षमता निर्माण झाली.

नवलोक व्यवस्थापनातुन शासनाच्या सार्वजनिक कार्य क्षेत्रात व्यावसायीक व्यवस्थापनाचा स्विकार करण्यात आला. समाज कल्यानाच्या नावाखाली होणाऱ्या अवास्तव खर्चात कपात होऊन प्रशासन कार्यास वित्तीय शिस्त लावण्याचा प्रयत्न नवलोक व्यसस्थापनामुळे होत आहे. शासनाच्या मालकीच्या सार्वजणीक उपक्रमांचे खाजगीकरण करुन निर्गुतवणुक धोरणाचा अंगीकार करण्यात आला. नवलोक व्यवस्थापनामुळे शासनांच्या योजनांचे कार्याचे प्रभावी मुल्यमापन केले जाऊ लागले. शासनाच्या कार्यात पाळली जाणारी गुप्तता नष्ट होऊन प्रशासन कर्याची माहिती सर्वसामान्य जनतेसाठी खुली करण्यात आली प्रशासन कार्यातपारदर्शकता निर्माण झाली. एकंदर नवलोक व्यवस्थापन संकल्पणेच्या उदयातुन सुशासनाच्या निर्मीतीस मोलाची मदत झालेली आहे. तरी देखील भ्रष्टाचारासारख्या समस्येस आजुनहि शासन तेवढ्या प्रमाणात प्रतिबंध घालू शकलेले नाही.

**संदर्भ सुची**

१) २१ वी शताब्दी में लोकप्रशासन- अशोक दुबे, टाटा मॅकग्राहिल पब्लीकेशन, नवी दिल्ली -२००८
२) लोकप्रशासन- डॉ.बी.एल.फाडीया, साहित्यभुवन प्रशासन, आग्रा-२००६
३) लोकप्रशासन- आशोक कुमार, उपकार प्रकाशन, आग्रा-२००७
४) लोकप्रशासन सिद्धांत व व्यवहार, सुरेंद्र कटारीया, नेशनल पब्लीसींग हाऊस ,जयपुर- २००७
५) भारत मे लोकप्रशासन, सुरेंद्र कटारीया, नेशनल पब्लीसिंग हाऊस जयपुर -२००८
६) भारतीय प्रशासन, श्रीराम माहेश्वरी, ओरिएन्ट लॉगमन, मुंबई -२०१००